## निशाणी क्र.३३ वरील आदेश

प्रतिवादी क्र.९ व १० यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द कैफीयत व मोजणी अर्जास म्हणणे देणेकामी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी व त्यांचे कैफीयत व म्हणणे स्वीकारण्यासाठी दाखल केला आहे.

**प्रतिवादींची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. वादीने प्रस्तुतचा दावा त्यांचेविरुध्द हद्दीखुणा कायम करुन मिळण्यासाठी, जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीने पूर्वी त्यांचेविरुध्द दाखल केलेल्या रे.मु.नं.६६/२०१४ चे कागदपत्रांच्या नक्कला उपलब्ध न झाल्याने वेळेत कैफीयत दाखल करता आली नाही. प्रकरणाचा गुणान्वये निकाल होण्यासाठी कैफीयत स्वीकारणे त्यांचे हिताचे दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास त्यांचेवर अन्याय होऊन त्यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. उलट कैफीयत दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. कैफीयत व मोजणी अर्जास म्हणणे देणेकामी त्यांनी जाणुनबुजून विलंब केलेला नाही. झालेला विलंब हा योग्य व न्यायकारणामुळे झालेला आहे. तो माफ होऊन त्यांची कैफीयत म्हणणे स्वीकारण्यात यावे अशी विनंती त्यांनी केली.

३. वादीने त्यांचे म्हणणे सदर अर्जाचे मलपृष्ठावर दाखल केले व अर्ज व त्यामध्ये कथन केलेला संपूर्ण मजकूर खोटा असून दिलेल्या विलंबाचे कारणाचा

पुरावा दिलेला नाही, दिलेले कारण योग्य नाही, किती विलंब झाला ते नमूद केले नाही व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली व न्यायालय अर्ज मंजूर करण्याचे निर्णयाप्रत आल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली.

४. अर्ज वाचला, त्यावरील वादीचे म्हणणे पाहिले, अभिलेख पाहिला. प्रतिवादी हजर झाल्यानंतर त्यांची वेळोवेळी अर्ज देऊन कैफीयत दाखल करण्यासाठी मुदती मागून घेतल्या. निशाणी ३१ कडील अर्ज त्यांनी मुदतीसाठी दाखल केलेला असून सदर अर्ज ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी होऊन गेल्याने नामंजूर केलेला आहे. अभिलेखावरुन एकंदरीतरित्या असे दिसून येते की, प्रतिवादीस त्यांची कैफीयत दाखल करण्याकरीता पुरेसा वेळ दिलेला आहे. असे असून देखील त्यांनी त्यांची कैफीयत वेळेत दिलेली नाही व निशाणी ३१ कडील अर्ज नामंजूर झाल्याने त्यांचेविरुध्द विनाकैफयतीचा आदेश देखील झालेला आहे. प्रतिवादींच्या विरुध्द विनाकैफीयतीचा आदेश झालेला असताना तो रद्द न करुन घेता त्याने विलंब माफीचा अर्ज करुन कैफीयत स्वीकारण्याची विनंती केली आहे. सबब, अर्जातील कथने व प्रकरणातील झालेले आदेश हे एकमेकांशी विसंगत असे आहेत. सबब, विना कैफीयतीचा झालेला आदेश रद्द न करता प्रस्तुत अर्ज मंजूर करणे संयुकतीक होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात येतो.

माळशिरस

दि.१६.०८.२०१९ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : **S.S.Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Judgment signed by P.O. on : **16.08.2019.**

(d) Judgment uploaded on : **17.08.2019.**